
# नागरिकांची सनद




**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**

**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१**

**२८, क्वीन्स गार्डन, नवीन सर्कीट हाऊस शेजारी, कॅम्प, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र.०२०-२६३६०९४१ फॅक्स क्र.०२०-२६३६००२६**

**ई-मेल trti.mah@nic.in वेबसाईट- trti.maharashtra.gov.in**

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास विभागाकडे राज्यातील अनुसूचित जमातीच्या सर्वांगिन विकासासाठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या ९६८.७९ लाख असून यापैकी आदिवासी लोकसंख्या ८५.७७ लाख आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्याची टक्केवारी ८.८५ % आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ही शासकिय संस्था दिनांक १ मे, १९६२ रोजी केंद्र पुरस्कृत योजनेखाली स्थापन करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनामार्फत आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आदिवासी जीवनावर झालेल्या परिणामाचे मूल्यमापन तसेच आदिवासी जीवन व विकास यांचेशी संबधित विषयावर संशोधन करण्याची महत्वाची जबाबदारी या संस्थेवर ओ. अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी समित्यांच्या कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण या संस्थेमार्फत करण्यात येत असून इतर अनेक योजना व प्रशिक्षण या संस्थेमार्फत राबविले जात आहेत.

आदिवासी कला व संस्कृती जतन करण्याकरीता आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय चालविणे व हस्तकला प्रदर्शन्, लघुपटांची निर्मितीही या संस्थेमार्फत केली जाते या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती तसेच आदिवासीना विविध योजनामार्फत उपलब्ध होणाऱ्या सेवा व लाभ व त्या पुरविण्यासाठी आवश्यक ती कालमर्यादा व सदरचा लाभ मिळण्यास अडचण निर्माण झाल्यास लाभार्थ्यांनी संपर्क साधण्याचा अधिकारी इतरही माहिती दर्शविणारी सोबतची नागरीकाची सनद तयार करण्यात आली आहे.

आयुक्त,<br>
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे

अनुक्रमणिका


| अ.क्र. | योजनेचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कार्य व संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना / उपक्रमांची माहिती. | ४-५ |
| २. | अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र  तपासणी समिती | ६-१३ |
| ३. | आदि प्रमाण प्रणाली (e-tribe Validity ) | १४-१५ |
| ४. | प्रशिक्षण योजना | १६-१८ |
| ५. | एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम | १९ |
| ६. | आदिवासी सांस्कृतिक महोत्सक आयोजित करणे | २०-२१ |
| ७. | आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय | २२ |
| ८. | वारली चित्रकला प्रदर्शन | २३ |
| ९. | कार्यालय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील व अधिनस्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे नांवे व दुरध्वनी क्रमांक | २४ |

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कार्य व संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना / उपक्रमाबाबतची माहिती.**

## १. स्थापना :-

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ही शासकीय संस्था १ मे, १९६२ रोजी केंद्र पुरस्कृत योजनेखाली स्थापन करण्यात आली.

## २. प्रशासकीय संरचना :-

आयुक्त हे संस्थेचे प्रशासकीय प्रमुख आहेत. संस्थेच्या दैनदिन कामकाजासाठी त्यांना सहाय्य करण्यासाठी एक सहसंचालक व एक उपसंचालक (एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम- एक्षेविका (Intigrated Area Development Programe - IADP) हे कार्यरत आहेत. संस्थेकरिता व संस्थेच्या अधिनस्त असलेल्या आठ समिती कार्यालयाकरीता विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकुण ३६३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६६ पदे या संस्थेच्या कार्यालयाकरीता व २९७ पदे ही समिती कार्यालयासाठी मंजूर आहेत.

संस्थेचे प्रशासकीय संरचनेचे संक्षिप्त स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

**आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

- **सहआयुक्त,**
  **अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
  **पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, औरंगाबाद,**
  **अमरावती, नंदूरबार व गडचिरोली**
- **सहसंचालक**
  **(आ.सं.प्र.सं. मुख्यालय)**
  - उपसंचालक (एक्षेविका व मूल्यमापन)
  - १. प्रशिक्षण
    २. संग्रहालय
    ३. संशोधन
    ४. समन्वय
    ५. ग्रंथालय

## ३. संस्थेची उदिष्टये आणि कार्य :-

१. केंद्र व राज्य शासनामार्फत आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आदिवासी जीवनावर झालेल्या परिणामांचे मूल्यमापन करणे.

२. आदिवासी जीवन व विकास यांचेशी संबधित विषयावर संशोधन करणे.

३. आदिवासी विकास विभागात कार्यरत अधिकारी/कर्मचारीवृंदाकरिता सेवांतर्गत प्रशिक्षण तसेच आदिवासी विद्यार्थ्यांकरिता सेवापूर्व प्रशिक्षण राबविणे.

४. आदिवासीकरिता विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करणे

५. आदिवासी कला व संस्कृती जतन करण्याकरिता आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय चालविणे, हस्तकला प्रदर्शन, लघुपटांची निर्मिती करणे.

६. अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची तपासणी समित्यांच्या कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.

# अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती

आदिवासी विकास विभाग समाज कल्याण विभागातून दिनांक १ मे, १९८३ रोजी वेगळा झाल्यानंतर शासनाने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठी शासन, आदिवासी विकास विभाग, निर्णय क्र. सीबीसी-१६८४/ २८१(२५)/ का.११, दिनांक २३ जानेवारी, १९८५ अन्वये संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली तपासणी समितीची स्थापना केली. या समितीची रचना खालीलप्रमाणे होती.

| | | |
|---|---|---|
| १. | संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, म.रा.पुणे | अध्यक्ष |
| २. | मुख्य संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | सदस्य |
| ३. | उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | सदस्य सचिव |

त्यानंतर आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. एसटीसी-१०९०/ २३९४२/ १८६/ का.१०, दिनांक ३ जून, १९९२ अन्वये नाशिक व नागपूर येथे उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली दोन नवीन समित्या स्थापन करण्यात आल्या. त्याच धर्तीवर दिनांक ३० डिसेंबर, १९९२ अन्वये पुणे समितीची पुनर्रचना करण्यात आली.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७/१९९३ व सिव्हील अर्ज क्र. ५८५४/१९९४ कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास व इतर या प्रकरणी दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक सूचना अन्वये महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. एसटीसी-१०९५/प्र.क्र.११८/का.१०, दिनांक २६ ऑक्टोबर,१९९५ अन्वये तत्कालीन संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली तिन्ही समित्यांची पुनर्रचना करण्यात आली व समित्यांमध्ये संबंधित विभागाचे अपर आयुक्त, आदिवासी विकास हे सदस्य म्हणून तर उपसंचालक (संशोधन) हे सदस्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आलेले होते. तसेच अनुसूचित जमातीचा दावा पडताळणी प्रकरणी संशयास्पद प्रकरणी अर्जदाराच्या शालेय व गृहचौकशी करण्यासाठी सदर समित्यांच्या अधिनस्त शासन निर्णय **दिनांक १५ मार्च, १९९६ अन्वये पोलीस दक्षता पथकाची** निर्मिती करण्यात आली. या दक्षता पथकामध्ये पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक व पोलीस शिपाई या पदांचा समावेश आहे.

तदनंतर आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. एसटीसी-१०९९/प्र.क्र.१३८/का.१०, दिनांक ६ सप्टेंबर, २००० अन्वये **ठाणे, औरंगाबाद व अमरावती** येथे आणखी तीन नवीन समित्या व त्यांच्या अधिनस्त तीन पोलीस दक्षता पथकाची निर्मिती करण्यात आली.

तसेच आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. एसटीसी-१००३/प्र.क्र.१७४/ का.१०/ दिनांक ११ जानेवारी, २००५ नुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांसाठी पूर्णवेळ **सहआयुक्त तथा उपाध्यक्ष** या पदांची निर्मिती करण्यात आली.

आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. एसटीसी-१००६/प्र.क्र.१८६/का.१०, दिनांक ८/१२/२००६ अन्वये नाशिक व नागपूर या समित्यांचे विभाजन करुन अनुक्रमे **नंदूरबार व गडचिरोली** येथे दोन नवीन तपासणी समित्या व दोन पोलीस दक्षता पथकांची निर्मिती करण्यात आली.

अशा पध्दतीने राज्यात सद्यस्थितीत एकूण आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या, पुणे, नाशिक, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नंदूरबार, नागपूर व गडचिरोली येथे कार्यरत आहेत.

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे कार्यलये व समितीचे अधिकारतेचे क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे नाव | महसुल विभाग | कार्यक्षेत्रातील जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१. | पुणे | पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर |
| २ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>कोकण विभाग, ३ रा मजला, वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, कोरस कंपनीसमोर,<br>वर्तकनगर, ठाणे (प) ४०० ६०४. | कोंकण विभाग | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |

| अ. क्र. | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे नाव | महसुल विभाग | कार्यक्षेत्रातील जिल्हे |
|---|---|---|---|
| ३ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग, आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक-२. | नाशिक | नाशिक, अहमदनर |
| ४ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद विभाग, सेंट लॉरेंन्स हायस्कुल जवळ, टाऊन सेंटर, सिडको,<br>औरंगाबाद-४३१०००१. | औरंगाबाद | औंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली. |
| ५ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती विभाग, इर्विन चौक,<br>अमरावती ४४४६०१ | अमरावती | बुलढाणा., वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ |
| ६ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर विभाग, आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर-४४० ०१०. | नागपूर | वर्धा,. नागपूर, भंडारा, गोंदिया |
| ७ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदूरबार शितकरण केंद्राची इमारत, आर.टी.ओ. ऑफ़िसजवळ, साखरी रोड, नंदूरबार. | नाशिक | नंदूरबार, जळगाव,धुळे |
| ८ | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली प्रकल्प कार्यालयाशेजारी, कॉम्पलेक्स, गडचिरोली विभाग, गडचिरोली. | नागपूर | चंद्रपुर, गडचिरोली. |

**या समित्यांची रचना खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २. | सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती | उपाध्यक्ष |
| ३. | उपसंचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| ४. | वरिष्ठ संशोधन अधिकारी | सदस्य |
| ५. | संशोधन अधिकारी | सदस्य |

महाराष्ट्र राज्यात **महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र. २३)** पारीत करण्यात आलेला आहे व या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने **महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३** हे दिनांक ०४/०६/२००३ अन्वये अस्तित्वात आले आहेत.

अधिनियमातील कलम-८ अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्या संबंधातील जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कलम ३ अन्वये सक्षम प्राधिका-याकडे अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत आणि या अधिनियमान्वये सक्षम प्राधिका-याकडून किंवा पडताळणी समितीकडून किंवा अपील प्राधिका-याकडून करण्यात येणा-या कोणत्याही चौकशीच्या बाबतीत किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीच्या बाबतीत, **आपण त्या जातीचे, जमातीचे किंवा वर्गाचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणा-या अर्जदार व्यक्तींवर असेल.**

# <u>अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्राची तपासणी/पडताळणी करणे.</u>

**"महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३)"** पारीत करण्यात आला. तसेच या अधिनियमांची अंमलबजावणी होण्याकरिता **"महाराष्ट्र अनुसूचित जमाती, प्रमाणपत्र (देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३** दिनांक ४/६/२००३ रोजी पारीत झाले.

या नियमांमध्ये अनुसूचित जमातीचा दावा करणाऱ्या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठीची व त्याच्या पडताळणीसाठीची सर्व कार्यपध्दती **महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३** नियम ९, ११ व १२ मध्ये विशद करण्यात आलेली असून त्याप्रमाणे प्रत्येक समितीकडून अनुसूचित जमाती प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते.

**नियम ९ :- तपासणी समितीच्या बैठकी आणि गणपूर्ती :-**

१) कोणतीही सुनावणी करण्यासाठी किंवा निर्णय घेण्यासाठी बैठकीस एकूण पाच सदस्यांपैंकी पुढील तीन सदस्य मिळून अनुसूचित जमात प्रमाणपत्र तपासणी समितीची गणपूर्ती होईल :-

१) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष

२) सदस्य-सचिव

३) अन्य कोणताही सदस्य.

२) एका विशिष्ट बैठकीत चार सदस्य उपस्थित असतील आणि समान संख्येतील सदस्यांची दोन भिन्न मत असतील तर प्रकरण निर्णयासाठी पूर्ण समितीसमोर ठेवण्यात येईल.

३) बहुमताने घेतलेला निर्णय समितीचा निर्णय असेल.

४) तपासणी समिती महिन्यातून कमीत कमी एकदा बैठक घेईल.

**नियम ११ :- तपासणी समितीने अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करणे :-**

१) सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, अधिनियमाच्या कलम-३ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनाकरीता अनुसूचित जमातीसाठी असलेले लाभ किंवा सवलतींचा फायदा घेऊ इच्छिणारी कोणतीही व्यक्ती, अशा प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी आणि वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी संबंधित तपासणी समितीकडे **नमुना-इ** मध्ये अर्ज करील.

२) अर्जदार त्याच्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी त्याच्या अर्जासोबत पुढील दस्ताऐवज सादर करील :-

क) मूळ दस्तऐवज :- (एक) एका साक्षांकित प्रतीसह, अर्जदाराचे मूळ अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र ;

दोन) नमुना-“फ” मधील शपथपत्र.

ख) **अर्जदाराच्या सदंर्भातील दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रती -**

(एक) प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

(दोन) शाळा प्रवेशाच्या नोंदवहीचा उतारा

(तीन) जन्म नोंदवहीचा उतारा

ग) **वडिलांबाबतचे दस्तऐवज-**

(एक) जन्मनोंदवहीचा उतारा

(दोन) प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

(तीन) शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा

(चार) अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र

(पाच) वडील सेवेत असल्यास, सेवा पुस्तकाच्या ज्या पृष्ठांवर धर्म व जमातीची नोंद असेल त्या पृष्ठांचा उतारा

(सहा) वडील अशिक्षित असल्यास, अर्जदाराच्या वडिलांच्या बाजूकडील वयस्क रक्तसंबंधित नातेवाईकाचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आणि शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा

घ) **अन्य दस्तऐवज :-** (एक) जन्म नोंदवही, ७/१२ चा उतारा, विक्री विलेख इत्यादी सारखा महसुली अभिलेख

(दोन) त्याच्या अनुसूचित जमातीसंबंधीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ असलेले अन्य कोणतेही संबंधित दस्तऐवज

(तीन) अनुसूचित जमातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ अर्जदाराच्या जवळच्या ज्या नातेवाईकांची वैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत त्यांची शपथपत्रे.

३) अर्जदार, तपासणी समितीला छाननी करण्यासाठी जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा मूळ प्रमाणपत्रे आणि दस्तऐवज सादर करील.

**नियम १२ :- तपासणी समितीने अनुसरावयाची कार्यपध्दती :-** १) अर्ज मिळाल्यानंतर तपासणी समिती किंवा तिने प्राधिकृत केलेली व्यक्ती अर्जाची, अर्जातील माहितीची आणि दस्तऐवजांची छाननी करील आणि अर्ज मिळाल्याची पोच देईल. सदस्य-सचिव, तपासणीसाठी मिळालेल्या अर्जाची अध्यक्षाने विहीत केलेल्या नोंदवहीत नोंद घेईल.

२) अर्जदाराने सादर केलेल्या लेखी पुराव्याबाबत तपासणी समितीचे समाधान झाले नाही तर, तपासणी समिती ते अर्ज शालेय, गृह आणि इतर चौकशी करण्यासाठी दक्षता पथकाकडे पाठविल.

३) दक्षता अधिकारी, अर्जदाराच्या निवासाच्या स्थानिक ठिकाणी आणि तो ज्या ठिकाणी राहात असेल त्या मूळ ठिकाणी आणि नेहमीच्या राहाण्याच्या ठिकाणी किंवा स्थलांतराबाबतीत, तो राहात असलेल्या ज्या मूळ ठिकाणाहून त्याने स्थलांतर केले असेल अशा नगरात किंवा शहरात किंवा गावाच्या ठिकाणी जाईल.

४) दक्षता अधिकारी, अर्जदार किंवा त्याचे आईवडील किंवा यथास्थिती, त्याचे पालक यांच्याकडून दावा केलेल्या सामाजिक दर्जाची व्यक्तिशः तपासणी करील आणि सर्व वस्तुस्थितीची माहिती गोळा करील.

५) दक्षता पथक, अर्जदाराच्या जमातीची तपासणी करण्यासाठी अर्जदाराच्या आई-वडिलांची किंवा पालकांची किंवा अर्जदाराची सुध्दा तपासणी करील.

६) चौकशी पूर्ण झाल्यानंतर, दक्षता पथक त्यांचा अहवाल तपासणी समितीला सादर करील, तपासणी समिती, दक्षता पथकाने सादर केलेल्या अहवालाची छाननी करील.

७)	दक्षता पथकाचा अहवाल अर्जदाराच्या बाजूने असेल आणि अर्जदाराचा दावा खरा व सत्य असल्याबाबत तपासणी समितीची खात्री पटल्यास, तपासणी समिती वैधता प्रमाणपत्र देऊ शकेल. वैधता प्रमाणपत्र **"नमुना-ग"** मध्ये देण्यात येईल.

८)	दक्षता पथकाचा अहवाल आणि इतर उपलब्ध दस्तऐवजांच्या आधारावर अर्जदाराने केलेल्या दाव्याबाबत तपासणी समितीचे समाधान झाले नाही तर, समिती, अर्जदारास कारणे दाखवा नोटीस देईल आणि दक्षता अधिकाऱ्याच्या अहवालाची एक प्रतही पोच देय नोंदणी डाकेने पाठविल. आवश्यक असेल तर संबंधित विभाग प्रमुखालाही एक प्रत पाठविल. नोटिशीमध्ये दर्शविण्यात येईल की, अभिवेदन किंवा उत्तर कोणतेही असल्यास ते नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत द्यावे आणि कोणत्याहीबाबतीत, हा कालावधी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांहून अधिक असणार नाही. अर्जदाराने, कालमर्यादा स्थगित करण्यासाठी किंवा ती वाढविण्यासाठी विनंती केल्यास अशा प्रकरणी त्याला वाजवी कालमर्यादा देण्यात येईल.

९)	(क) व्यक्तिशः म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दाव्याच्या खरेपणाविषयी तपासणी समितीचे समाधान झाल्यास **"नमुना-ग"** मध्ये वैधता प्रमाणपत्र देण्यात येईल.

(ख)	व्यक्तिशः म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दाव्याच्या खरेपणाविषयी आणि अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या अचूकतेविषयी तपासणी समितीचे समाधान झाले नाही तर, ती प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचा आदेश काढील आणि प्रमाणपत्र जप्त करील आणि हे, समुचित प्राधिकाऱ्यास नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी घेण्यासाठी आणि आवश्यक ती पुढील कारवाई करण्यासाठी कळविल. त्यानंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांवर "रद्द आणि जप्त करण्यात आले" असा शिक्का मारण्यात येईल

# आदि प्रमाण प्रणाली (e-tribe validity)

भारतीय घटनेमध्ये मागास प्रवर्गास आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया सक्षम करण्याकरिता तसेच त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता काही घटनात्मक अधिकार दिलेले आहेत. तसेच केंद्र शासनाने वेळोवेळी सर्व राज्यांकरिता मागास प्रवर्गाच्या याद्या प्रसिध्द केलेल्या आहेत. या यादीमध्ये समाविष्ट असणाऱ्या संबंधित जाती-जमातीच्या व्यक्तींना संबंधित प्रवर्गाचे लाभ अनुज्ञेय आहेत.

महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या अनुसूचित जमातीच्या समाविष्ट असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) व्यक्तींना अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय आहेत. याकरिता अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व्यक्तींना अशा जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करुन घेणे शासनाने अनिवार्य केलेले आहे. याकरिता राज्यात **महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२०००** व **महाराष्ट्र अनुसूचित जमोतीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), नियम,२००३** आस्तित्वात आहेत.

राज्यामध्ये आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीची कार्यालये आदिवासी विकास विभागांतर्गत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली कार्यरत आहेत.

राज्यामध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीचे काम या समित्यांमार्फत १९८५ पासून सुरु आहे. समित्यांच्या कामकाजामध्ये सुलभता, पारदर्शकता व गतिमानता आणणे तसेच राज्यातील आदिवासी जनतेस त्यांचे घटनात्मक अधिकार तातडीने प्राप्त होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागांतर्गत दिनांक १ मे, २०१६ पासून **आदि प्रमाण प्रणाली (e-tribe validity)** ही संगणक प्रणाली अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यालयाकरिता विकसित केलेली आहे. ही प्रणाली वेबबेस्ड असून ती https:// www.etribevalidty.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या संगणक प्रणालीमार्फत सद्यस्थितीत ऑनलाईन पध्दतीने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची प्रक्रीया राबविण्यात येत आहे, ज्यामुळे अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधताबाबत संबधित समित्याकडून त्वरीत तपासून घेणे शक्य होत आहे.

## प्रणालीतील उपलब्ध सुविधा

| | |
|---|---|
| ▪ | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा व संपूर्ण पडताळणीची कार्यवाही ऑनलाईन, बायोमॅट्रीक यंत्रणा व टोकन सिस्टीम इत्यादी यंत्रणा लिंक करुन समितीचे काम जलद गतीने करण्यात येत आहे. |
| ▪ | ऑनलाईन पध्दतीने अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा तसेच ई-मेल, एसएमएस द्वारेही प्रकरणांची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा अर्जदारास उपलब्ध आहे |
| ▪ | ऑनलाईन वैधता प्रमाणपत्रावर अर्जदाराचा फोटो फोटो व युनिक बारकोड क्रमांकाची सुविधा देण्यात आली आहे. |
| ▪ | संबंधित नियुक्ती, प्राधिकारी तसेच शैक्षणिक संस्था इत्यादींना वैधता प्रमाणपत्राची सत्यासत्याता ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करण्याची सुविधा देण्यात आली आहे. |
| ▪ | या प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबत पडताळणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे काही कागदपत्रे अपूर्ण असल्यास तसे एसएमएस अथवा ई-मेल द्वारे कळविण्यात येत आहे. |
| ▪ | त्यावेळी टोकन सिस्टीम व बायोमॅट्रीक यंत्रणेच वापर करुन अर्जदाराची मूळ कागदपत्रे स्विकारुन त्यास पोहोच देण्यात येते. |
| ▪ | अर्जदाराची समितीपुढे सुनावणी झाल्यानंतर त्याचा दावा अवैध ठरल्यास त्याप्रमाणे आदेश पारित करुन ते संबंधिताना बजावण्यात येतात. |

# प्रशिक्षण विभाग

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या या संस्थेची स्थापना १९६२ मध्ये करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाच्या विविध स्तरावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसेच आदिवासी युवक-युवतींसाठी विविध स्पर्धा परिक्षाबाबत प्रशिक्षण देण्याचे कार्यक्रम या संस्थेमार्फत आयोजित केले जातात. त्यांचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे:-

**अ) सेवांतर्गत प्रशिक्षण सत्रे :**

आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक, आदिवासी विकास निरीक्षक, शासकीय आश्रमशाळा मुख्याध्यापक, विविध विषयाचे विविध शिक्षक, वसतिगृह अधीक्षक, शासकीय वसतिगृहाचे गृहपाल इ. कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांना कौशल्यात व ज्ञानात वाढ व्हावी व त्यांचे प्रशासकीय ज्ञान अदययावत व्हावे, जेणेकरुन त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी याकरिता सेवांतर्गत प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले जाते.

**ब) सेवापुर्व प्रशिक्षण सत्रे :**

शासकीय कार्यालयामध्ये आदिवासी जमातींचा अनुशेष बऱ्याच अंशी रिक्त असल्याचे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. यावर उपाययोजना म्हणून संस्थेच्या वतीने एक महिना कालावधीचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केली जातात. यामध्ये प्रशिक्षणार्थींना विविध स्पर्धा परीक्षा संबंधी मार्गदर्शन, स्पर्धा परिक्षांचा अभ्यासक्रम, स्पर्धा परिक्षांची विविध पुस्तके, बेसिक विषयांबाबतचे मार्गदर्शन इ. स्वरुपाचे मार्गदर्शन दिले जाते.

प्रशिक्षणार्थींना दिल्या जाणाऱ्या सोई-सुविधा :

१. निवासाची मोफत सोय
२. दैनिक निर्वाह भत्ता (प्रति दिन रु.१५०/-)
३. येण्या-जाण्याचा प्रवास खर्च (एसटी किंवा रेल्वेचे व्दितीय श्रेणीचे भाडे)
४. शैक्षणिक साहित्य (रु.७००/- पर्यंत किंमतीची स्पर्धा परीक्षेकरिता उपयुक्त अशी पुस्तके)
५.

**क) आदिवासी युवक / युवतींसाठी नेतृत्व प्रशिक्षण सत्र :**

शासनामार्फत आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना सर्वश्रुत होण्यासाठी व त्यातील अडचणीवर मात करण्यासाठी, प्रत्यक्ष लाभार्थी व योजना राबविणारी यंत्रणा यांच्यात सुसंवाद घडवून आणणे व योजना चांगल्या प्रकारे

राबविणे ह्या हेतूने प्रकल्प स्तरावर आदिवासी युवक-युवतींकरीता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

दिल्या जाणाऱ्या सुविधा :

१. दैनिक भत्ता (रु.१५०/- प्रति दिन)
२. येण्या-जाण्याचा खर्च (एसटी किंवा रेल्वे व्दितीय श्रेणी भाडे)
३. शैक्षणिक साहित्य (रु. ७००/- पर्यंत)

**ड) संघ लोकसेवा आयोग/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणा-या स्पर्धा परिक्षांसाठी प्रशिक्षण देण्याची योजना**

शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई क्र.प्रशिक्षण २०१२/प्र.क्र १५८(भाग-२)/का-१७/दि १५ जुलै,२०१४ अन्वये राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता संघ लोकसेवा आयोग/ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (युपीएसी/एमपीएससी) घेण्यात येणा-या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राज्यातील ८ विद्यापीठ, व बार्टी या ठिकाणी प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांकरिता ८ महिन्यांच्या कालावधीकरीता व यशदा,पुणे येथे १० विद्यार्थ्यांना ११ महिन्यांच्या कालावधीकरीता अशा एकूण २३५ उमेदवारांना स्पर्धा पूर्व परीक्षेचे प्रशिक्षण देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेची नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांना घोषित करण्यात आलेले आहे. तसेच योजनेची अंमलबजाणी बार्टी,पुणे व यशदा,पुणे यांच्यामार्फत करण्यात येते.

सदर प्रशिक्षणा दरम्यान पुढील सोई सुविधा उमेदावारांना उपलब्ध करुन दिल्या जातात -

१. विद्यावेतन रु ४००० प्रतिमहा.

२. शैक्षणिक साहित्य

३. इंटरनेटसह संगणक सुविधा.

४. ग्रंथालय सुविधा.

सदर प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यासाठी सामान्य ज्ञानावार आधारित चाळणी परिक्षा परिक्षा (CET) घेण्यात येते त्यामधून जास्त गुण प्राप्त करणा-या उमेदवारांची निवड प्रशिक्षणासाठी करण्यात येते.

**इ. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणा-या अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परिक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्याची योजना**

महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-अ आणि गट-ब साठीच्या स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज केलेल्या/बसण्यास इच्छुक असणाऱ्या, राज्यातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील बी.ई (स्थापत्य) उमेदवारांना पूर्व परिक्षेचे महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा) नाशिक व नागपूर येथे प्रत्येकी ३० याप्रमाणे ६० अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पूर्व परिक्षेचे २ महिने कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच पूर्व परिक्षा उत्तीण झालेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना ४ महिन्यांच्या कालावधीचे मुख्य परिक्षेचे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच मुख्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी सर्वंकष तयारी सदर प्रशिक्षण संस्थेकडून करुन घेण्यात येते.

सदर प्रशिक्षणा दरम्यान पुढील सोई सुविधा उमेदावारांना उपलब्ध करुन दिल्या जातात

१. राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत व्यवस्था. २. शैक्षणिक साहित्य. इत्यादी.

**ई. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणा-या राज्य दुय्यम न्यायिक सेवेतील स्पर्धा परिक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्याची योजना**

आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दि. २ डिसेंबर, २०१४ अन्वये, बार कौंसिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (बीसीएमजी) या संस्थेमार्फत अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील ७५ प्रशिक्षणार्थींकरीता सदरचा १ वर्षाचा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता प्रत्येक महसूली विभागातील प्रशिक्षणार्थी निवडले जातात.

सदर प्रशिक्षणा दरम्यान पुढील सोई सुविधा उमेदावारांना उपलब्ध करुन दिल्या जातात

१. राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत व्यवस्था.

२. शैक्षणिक साहित्य.

३. विद्यावेतन रु.२०००/- प्रति महिना.

४. इंटरनेटसह संगणक सुविधा इत्यादी.

**संपर्कः** आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

फोन- ०२०-२६३३०२३०/२६३६०९४१.

## एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम

Creating a Diploma Course in Sustainable Management of MFPs under FRA & PESA:

वन हक्क कायदा (२००६) आणि पेसा कायदा २०१२ या कायदयाखाली राज्यातील ५००० पेक्षा अधिक ग्राम सभांना सामुहिक वनहक्क प्राप्त झालेले आहेत. सदर हक्कांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता यावी यासाठी प्रशिक्षण आणि क्षमता निर्मितीची आवश्यकता आहे. ही बाब विचारात घेता मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था मुंबई, मुंबई विद्यापीठ यांचेकडुन पदवीका कार्यक्रमाचा अभ्यासक्रम निश्चित करुन तो पदवीका कार्यक्रम पूर्ण राज्यात सुरु करण्याबाबत आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.केंद्रिय - २०१७/प्र.क्र.६८/का-१९, दि.२९.०८.२०१७ अन्वये विशेष केंद्रीय सहाय्य योजना सन २०१७-१८ मधुन Creating a Diploma Course in Sustainable Management of MFPs under FRA & PESA या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. सदर योजनेद्वारा सामुहिक वन व्यवस्थापनाचा पदविका कार्यक्रम निर्माण करुन राबविण्यात येणार आहे.

सदर योजना राबविण्यासाठी नियंत्रक आधिकारी म्हणुन आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या योजनेचा कालावधी दि. १ सप्टेबर, २०१७ ते दि.३१ मार्च, २०१९ असा आहे. आदिवासी विकास विभाग, पत्र दि.१९/८/२०१७ अन्वये या योजनेसाठी रू. १२९.०० लक्ष निधी या संस्थेस वितरीत करण्यात आलेला आहे. सदर योजना राबविण्यासाठी मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई विद्यापिठ या अंमलबजावणी संस्थेस शासन निर्देशानुसार प्रथम टप्प्याचा खर्च म्हणून रक्कम रु. ६०.०० लक्ष एवढा निधी सन २०१७-१८ मध्ये वर्ग करण्यात आलेला आहे.

Community based approach to improve health and nutritional status and to reduce deaths of tribals of Melghat :

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.केंद्रिय - २०१७/प्र.क्र.६७/ का.१९ , दिनांक २८/०९/२०१७ अन्वये Community based approach to improve health and nutritional status and to reduce deaths of tribals of Melghat या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजना महान ट्रस्ट, वर्धा यांचेमार्फत राबविण्यात येणार आहे. सदरचा प्रकल्प पाच वर्षाचा असून तो सप्टेंबर २०१७ ते ऑगस्ट २०२२ पर्यंत असेल.

सदर योजनेचा उददेश / हेतु खालीलप्रमाणे आहे.

१. मेलघाटातील २० आदिवासी गावातील ५ वर्षाखालील बालकांचे मृत्युदर कमी करणे.(कमीत कमी ७० प्रती हजारी जन्म)
२. अतितीव्र कुपोषण कमी करणे (१० टक्क्यापेक्षा कमी)
३. वय वर्षे १६ ते ६० मधील आदिवासींचे मृत्युदर कमी करणे (२७० पेक्षा कमी)
४. नवजात बालकांचे व मातांचे मृत्युदर कमी करणे (२०० पेक्षा कमी)
५. अती गंभीर रोग्यावर उपचार करून मेळघाटातील रूग्णांचे प्राण वाचविणे.

## संग्रहालय विभाग

### १.आदिवासी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणे

सन २०१३-१४ पासून आदिवासी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणे, या योजनेतंर्गत एका सांस्कृतिक महोत्सवामध्ये खालीलप्रमाणे ३ कार्यक्रम एकत्रित राबविण्यात येतात.

### १) आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री - ५ दिवस

**उद्देश व स्वरुपः-**

आदिवासी हस्तकला वस्तूंना नागरी भागात मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध असल्यामुळे
दुर्गम भागात राहणारे आदिवासी व नागरी भागातील ग्राहक यांना एकत्रित आणून आदिवासींनी हस्तकलेने तयार केलेलया वस्तू प्रदर्शित करुन त्यांच्या विक्रीद्वारे या कलाकारांना स्वयंरोजगारची संधी उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

सन १९९२ पासून ही योजना कार्यान्वित आहे. ही योजना ५०% राज्य पुरस्कृत व ५०% केंद्र
पुरस्कृत आहे. आदिवासींनी तयार केलेल्या विविध कलाकृती व वस्तू विक्रीसाठी कलाकारांना स्टॉल उपलब्ध करुन देण्यात येतात. वर्तमान पत्र, स्ट्रिट बॅनर्स याद्वारे प्रदर्शनाची प्रसिध्दी केली जाते. सहभागी आदिवासी कारागीरांना मानधन, प्रवासखर्च देण्यात येतो. निवास, भोजन इत्यादी व्यवस्थापनाचा संपूर्ण खर्च संस्थेमार्फत करण्यात येतो.

**पात्रतेच्या अटीः-**

१.हस्तकलाकार आदिवासी असला पाहिजे.
२.त्याने प्रदर्शनात भाग घेण्याची तयारी दाखविली पाहिजे.

### २) आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा - १ दिवस

**उद्देश व स्वरुपः-**

आदिवासी जमातीनुरुप नृत्यांचे विविध प्रकार अस्तित्वात आहे. आदिवासींची ही संस्कृती जतन
करण्याच्या दृष्टीने व या नृत्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ही योजना तयार करण्यात आलेली आहे. सन १९८१ पासून ही योजना कार्यान्वित आहे. ही योजना ५०% राज्य पुरस्कृत व ५०% केंद्र पुरस्कृत आहे. नृत्यपथकातील कलाकारांना मानधन, प्रवासखर्च,

पेहराव भत्ता इत्यादी देण्यात येतो. तसेच स्पर्धेत गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांकांना बक्षिस देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी:-**

१.नृत्यकलाकार आदिवासी असला पाहिजे.

## ३) लघूपट महोत्सव-

**उद्देश व स्वरुप:-**

संस्थेने तयार केलेले लघुपट एल.सी.डी. प्रोजेक्टद्वारा आदिवासी सांस्कृतिक कला महोत्सवात प्रेक्षकांना दाखविण्यात येतात. या लघुपटांमुळे आदिवासी संस्कृतीची कल्पना शहरी भागातील दर्शकांना येते. त्यांच्याबद्दल कुतूहल तयार होते. तसेच आदिवासी संस्कृतीचा अनुभव येतो.असे लघुपट कुठेही उपलब्ध नसल्याने प्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रेक्षकांना ही एक पर्वणीच असते.

## ४. अनुबोधपट तयार करणे/लघुपट निर्मिती करणे

**उद्देश व स्वरुप:-**

सन १९८२ पासून ही योजना कार्यान्वित आहे. आदिवासी संस्कृतीची ओळख नागरी भागातील
लोकांना होणे सहज शक्य नसते. महाराष्ट्रातील आदिवासी कला, संस्कृती, जीवन तसेच शासनाकडून प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि आदिवासी समाजाच्या विविध ज्वलंत विषयावर या संस्थेने आतापर्यंत एकुण ९० लघुपटांची निर्मिती केली आहे. या लघुपटांमुळे आदिवासी संस्कृतीची सहज कल्पना येते. संस्थेने तयार केलेले लघुपट एल.सी.डी. प्रोजेक्टरद्वारे संग्रहालयाला भेट देणारे पर्यटक, विद्यार्थी यांना दाखविण्याची व्यवस्था संस्थेत करण्यात आलेली आहे. हे लघुपट आदिवासी सांस्कृतिक कलामहोत्सवामध्येही दाखविण्यात येतात.

**संपर्क- संग्रहालय अभिरक्षी ,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८, क्वीन्स गार्डन , पुणे. १**

## ३. आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय

**उदेदश व स्वरुप :-**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अधिनस्त आदिवासी संग्रहालयाची स्थापना सन १९६४ मध्ये शासन निर्णय No.१९६२/५१०८-१४ दिनांक २१.१.१९६५ करण्यात आली. आदिवासी जीवन, कला व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या मौल्यवान व दुर्मिळ वस्तूंचा संग्रह या संग्रहालयात करण्यात आलेला आहे. आदिवासी दागदागिने, देवदेवता, मुखवट, दैनंदिन वापरांच्या वस्तू, शेती कामासाठी व शिकारीसाठी वापरण्यात येणारी अवजारे, त्यांचे पोशाख, वाद्ये, वारली चित्रकलेचे नमुने इत्यादी साहित्य महाराष्ट्रातील वेगवेगळया आदिवासी भागातून प्राप्त करण्यात आलेले असून ते संग्रहालयात प्रदर्शित केलेले आहे. संग्रहालयास पुणे दर्शन आराम बसचे पर्यटक, देशी विदेशी पर्यटक, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी भेट देतात. शैक्षणिक माध्यम म्हणून संग्रहालय अतिशय उपयुक्त आहे. सदर संग्रहालयास जागतिक नकाशावर स्थान आहे. संग्रहालयात एकुण १३५१ आदिवासी वस्तु प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत.

संग्रहालय बघण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रवेशमुल्य आकारण्यात येते.

१.विदेशी पर्यटक - रु. २००/-

२. विदेशी लहान मुले - रु. १००/-

३. विदेशी विद्यार्थी - रु. ५०/-

४. देशी पर्यटक - रु. १०/-

५. देशी लहान मुले व विद्यार्थी - रु. ५/-

**संपर्क :- संग्रहालय अभिरक्षी**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८, क्वीन्स गार्डन, पुणे-१**

## ४. वारली चित्रकला स्पर्धा

**उदेदश व स्वरुप**

वारली चित्रकला स्पर्धा ही योजना शासन निर्णय क्र. टीआरआय-२०८५/१५/का.५ दिनांक १९ सप्टेंबर, १९८६ अन्वये सुरु करण्यात आली. या हेतूने संस्थेने ही कला जास्तीत जास्त लोकाभिमुख करुन या कलेचा वारसा जतन करण्याचा प्रयत्न केलेला असून ही कला जगाच्या पाठीवर सर्वत्र प्रसिध्द केली आहे. ही स्पर्धा बहुल आदिवासी भागात आश्रम शाळेत आयोजित केली जाते. त्यामध्ये अनुभवी कलाकार आणि शालेय विदयार्थी यांना एकत्र करुन चित्र काढून घेतली जातात. त्या माध्यमातून अनेक कलाकारांचे मार्गदर्शन पुढील पुढीला मिळते. चित्रांना बक्षीस देण्यात येत असल्याने हा बहुमान मिळविण्यासाठी प्रत्येक कलाकार अगदी लक्षपुर्वक अभ्यासातून चित्र रेखाटन करण्याचा प्रयत्न करतो. आणि या मधूनच नवनविन कल्पना आणि परंपरा यांची सांगड घातली जाते. चित्रांचे परिक्षण करणेसाठी जाणकार अनुभवी वयोवृध्द परिक्षकांना निमंत्रित केले जाते. या प्रमाणे दरवर्षी ही योजना या कार्यालयामार्फत राबविण्यात येते.

**पात्रतेच्या अटी**

कलाकार वारली अथवा कोकणा आदिवासी असला पाहिजे.

**संपर्क :- संग्रहालय अभिरक्षी**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८, क्वीन्स गार्डन, पुणे-१**

**आदिवासी विकास विभाग**
**आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील व अधिनस्त**
**क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नांवे व दुरध्वनी क्रमांक**

| अ.क्र. | पदनाम | अधिकाऱ्यांचे नांव | एसटीडी कोड | दुरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | आयुक्त | श्री. किरण कुलकर्णी भा.प्र.से | ०२० | २६३६०९४१ | २६३६००२६ |
| २. | सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती | | | | |
| १. | पुणे | श्री. एस.टी.भालेकर अतिरिक्त कार्यभार | ०२० | २६३३६९६१ | २६३६००२६ |
| २. | ठाणे | श्री. एस.टी.भालेकर | ०२२ | २५८५३६८८ | २५८८३५०३ |
| ३. | नासिक | श्री. एस.डी. गोलाईत | ०२५३ | २५७७०५९ | २२३२२८९ |
| ४. | औरंगाबाद | श्री. डी.पी.जगताप | ०२४० | २६६२९०१ | २३६९२११ |
| ५. | अमरावती | श्री. व्ही.एस.पाटील अतिरिक्त कार्यभार | ०७२१ | २५५०९९१ | २६६६६८८ |
| ६. | नागपूर | श्री. व्ही.एस.पाटील | ०७१२ | २५६००३१ | २५६००३१ |
| ७. | नंदूरबार | श्रीमती बी.जी.गिरी | ०२५६४ | २१०१३० | २१०१३० |
| ८. | गडचिरोली | श्री. एस.पी. वानखेडे | ०७१३२ | २२३१७९ | २२३१८० |